# श्री. जय भवानी इस्पात प्रा. लि., गट नं. ४४, ४५, ४६, ४६/१, अबिटघर, ता. वाडा, जि. पालघर, या प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त

श्री. जय भवानी इस्पात प्रा. लि., गट नं. ४४, ४५, ४६, ४६/१, अबिटघर, ता. वाडा, जि. पालघर, या प्रस्तावित २,४०,००० टन प्रति वर्ष एम एस/ एस.एस./ अलॉय स्टील इंगोटस/ बिलेटस, राउंड बार्स, रोल्ड उत्पादन, वायर इत्यादी उत्पादनाच्या प्रकल्पाकरिता पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्याबाबतचा प्रस्ताव, म.प्र.नि. मंडळाकडे प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीचे आयोजन दिनांक ०९.०५.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता, पंचायत समिती सभागृह, पंचायत समिती वाडा, ता. वाडा, जि. पालघर, येथे करण्यात आले. या जनसुनावणीकरता गठीत केल्या गेलेल्या समितीचे सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| श्री. किशोर तावडे,<br>अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, पालघर<br>(जिल्हाधिकारी, पालघर, यांचे प्रतिनिधी) | समिती अध्यक्ष |
| श्री. विनायक शिंदे<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, कल्याण | समिती सदस्य |
| श्री. सुजीत ढोलम,<br>उप प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, कल्याण | समिती समन्वयक |

उपस्थित अधिकारी वर्गामध्ये श्री. एच.बी. पाटील, प्रांत अधिकारी, वाडा व श्री. संदिप चव्हाण, तहसिलदार, वाडा, हे उपस्थित होते.

**पर्यावरण विषयक जाहीर सुनावणी समितीचे** समन्वयक श्री. सुजीत ढोलम, यांनी सर्व उपस्थित नागरिक व अधिकाऱ्यांचे स्वागत केले व अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणीच्या कामकाजास सुरूवात केली. जनसुनावणीच्या प्रक्रियेबाबत त्यांनी माहिती दिली. श्री. जय भवानी इस्पात प्रा. लि., गट नं. ४४, ४५, ४६, ४६/१,

अबिटघर, ता. वाडा, जि. पालघर, या प्रस्तावित २,४०,००० टन प्रति वर्ष एम एस/ एस.एस./ अलॉय स्टील इंगोटस/ बिलेटस, राउंड बार्स, रोल्ड उत्पादन, वायर, इत्यादी उत्पादनाच्या प्रकल्पाकरिता पर्यावरण विषयक जाहीर सुनावणी आयोजित करण्याबाबतचा प्रस्ताव, म.प्र.नि. मंडळाकडे प्राप्त झाला होता. केंद्र सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाचे १४ सप्टेंबर, २००६ च्या नोटिफिकेशनमधील तरतुदींनुसार वर्तमानपत्रामध्ये जाहीर सुनावणीची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. दिनांक ०६.०४.२०१६ रोजीच्या मराठी दैनिक पुण्यनगरी, तरूण भारत व इंग्रजी दैनिक फ्रीप्रेस जर्नल, या वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण आघात मुल्यांकन व त्याचे इंग्रजी व मराठी सारांश, प्रकल्प विषयचे इतर दस्ताऐवज, लोकांचे संदर्भ व अभ्यासाकरिता खालील कार्यालयांमध्ये ठेवण्यात आले होते. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर, जि. पालघर, जिल्हापरिषद ठाणे, जिल्हा उद्योग केंद्र उद्योग भवन, ठाणे, तहसिल कार्यालय, ता. वाडा, जि. पालघर, पंचायत समिती, ता. वाडा, जि. पालघर, प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि मंडळ, कल्याण, मुख्यालय मुंबई, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई ग्रामपंचायत कार्यालय, अबिटघर, ता. वाडा, जि. पालघर, संबंधित व्यक्तींना पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची माहिती मिळावी व अभ्यास करता यावा या उद्देशाने सदर अहवाल या कार्यालयांमध्ये जनतेस संदर्भाकरिता उपलब्ध करून दिले होते. तसेच या विषयी सुचना/टिप्पणी/हरकती सादर करण्याची विनंती केली होती.जाहीर सुनावणी दरम्यान प्रकल्प प्रवर्तकांचे सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाविषयीच्या सुचना/हरकतीकरता येतील, अशी माहिती दिली. जनसुनावणीचे इतिवृत्त हे पर्यावरण विभागाला सादर करण्यात येईल. या समितीचा उद्देश जनतेने उपस्थित केलेल्या हरकती /टिप्पणी, सुचना याची इतिवृत्तामध्ये नोंद घेउन शासनास सादर करणे हा असून प्रस्तावित प्रकल्पाबाबत कोणताही निर्णय घेण्याकरिता सदर समिती नसल्याचे सांगितले. यानंतर समिती समन्वयक यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण करण्यास सांगितले व अध्यक्ष महोदयांना जनसुनावणीची सुत्रे हाती घेण्याची विनंती केली.

**अध्यक्ष महोदयांनी** उपस्थित नागरिकांना जनसुनावणीचा उद्देश व प्रक्रिया याविषयी माहिती दिली. प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पाबाबतच्या तांत्रिक बाबींचे स्पष्टीकरण देणारे

सादरीकरण करावे. यानंतर नागरिकांनी त्यांचे हरकती/सुचना/टिप्पणी नोंदवाव्यात, त्या लेखी स्वरूपात देखील मांडाव्यात, म.प्र.नि.मंडळाच्या अधिकाऱ्यांनी ते स्विकारून त्याची पोच दयावी. प्रकल्प प्रवर्तकांनी सदर हरकतीविषयी स्पष्टीकरण द्यावे. प्रस्तावित प्रकल्पविषयक सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर चर्चासत्र केले जाईल. उपस्थित नागरिकांनी प्रकल्पाविषयीचे सादरीकरण शांतपणे ऐकावे व सनदशीर मार्गाने त्यांच्या सुचना नोंदवाव्यात. यानंतर प्रकल्पाचे सादरीकरण करण्याबाबत सुचना करण्यात आल्या.

प्रकल्प प्रवर्तकाने प्रस्तावित प्रकल्पाचे विस्तृतपणे सादरीकरण केले. सदर सादरीकरणामध्ये प्रकल्पासाठी लागणारा कच्चा माल, उद्योगासाठी लागणारे पाणी तसेच वीज, प्रदूषण नियंत्रण यत्रंणा इत्यादींचा विस्तृतपणे उल्लेख केला.

अध्यक्ष महोदयांनी तदनंतर सदर प्रकल्पाबाबत कोणाच्या काही तक्रारी किंवा आक्षेप असल्यास त्या लेखी वा तोंडी कळवाव्यात जेणेकरून प्रकल्प प्रवर्तक सदर तक्रारी व आक्षेपांचे निरसन करेल.

**श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी,** यांनी सर्वप्रथम सदर प्रकल्पास पाठींबा असल्याचे जाहीर केला. तसेच काही सुचनाही केल्या. ज्यामध्ये १० किलोमीटर रेडीयसमधील ग्राउंड वॉटर टेबलची मोजदाद करण्यात यावी तसेच उद्योगासाठी लागणा—या पाण्यासाठी रेन वॉटर हारवेस्टींगचा पर्याय निवडावा व रेन वॉटर हारवेस्टींग पासून मिळणा—या पाण्याची साठवणुक करण्यात यावी जेणेकरून ग्राउंड वॉटर टेबलची वाढ होईल. याबरोबरच औषधी वनस्पती व फळ झाडे लावण्यात यावीत जेणेकरून धुळीचे प्रदूषण कमी होईल. उद्योजकाने हवा प्रदूषण नियंत्रण सुध्दा बसविण्यात यावी व पाणी प्रदूषण, हवा प्रदूषण व जमीनीचे प्रदूषण होणार नाही आणि पर्यावरणाचा समतोल राखावा याबाबत सुचविले तसेच जाहीर सुनावणी दरम्यान लेखी निवेदनही सादर केले.

**श्री. एम.एस. रेडडी, पर्यावरणवादी,** यांनी सद्या पाण्याचा तुटवडा भरपूर असल्यामुळे उद्योजकाकडून रेन वॉटर हारवेस्टींग करण्यात यावे तसेच भरपूर प्रमाणात

झाडे लावण्यात यावीत. जेणेकरून पाण्याचा तुटवडा कमी होईल. जाहीर सुनावणी दरम्यान लेखी निवेदन सादर केले.

**अध्यक्ष महोदयांनी** याबाबतीत आपल्या सुचनांची अंमलबजावणी करण्यात येईल तसेच सी.एस.आर. फंडातील रक्कम प्राथमिकतेनुसार वापरण्यात येईल असे सांगितले.

यानंतर अध्यक्ष महोदयांनी असे सांगितले की, आपणा सर्वांच्या तोंडी व लेखी सुचना व हरकती यांची नोंद घेण्यात आली आहे. व त्यानंतर जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**(सुजीत ढोलम)**
**समन्वयक**
**उप प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि. मंडळ, कल्याण ३**

**(विनायक शिंदे)**
**समिती सदस्य**
**प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि. मंडळ, कल्याण**

**(किशोर तावडे)**
**समिती अध्यक्ष**
**अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, पालघर**